# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ /पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांकः- /०८/२०१८

## " खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस सात वर्ष सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"

पोलीस ठाणे दिघोरी अंतर्गत मौजा पारडी येथिल नामे वासुदेव कारु मेश्राम हा आपले पुतन्याचे चिकन सेंटर मध्ये बसलेला असतांना आरोपी नामे मिताराम मन्साराम मेश्राम, वय ४७ वर्ष रा.पारडी ता. लाखांदुर जि. भंडारा यांने वासुदेव मेश्राम यास भिकारी आहे याला कोंबडी देउ नको असे दुकाणादार यास म्हणुन भांडण करुन खुन करण्याचे उद्देशाने लोखंडी वासल्याने डोक्यावर मारुन गंभीर जख्मी केल्याचे आरोप सिध्द झाल्याने आज दिनांक ०४.०८.२०१८ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे अतिरीक्त सत्र न्यायाधिश श्री. सचिन. बि. भंसाली सा. यांनी आरोपीस सात वर्ष सश्रम कारावास व २००० रुपये द्रव्यदंडाची शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहीती अशी की, दिनांक २.०९.२०१६ रोजी वासुदेव कारु मेश्राम हे पुतन्या नामे अभिमन शालीकराम मेश्राम याचे चिकण सेंटर दुकाणात बसलेला असतांना गावातीलच राहणारा नामे मिताराम मन्साराम मेश्राम, वय ४७ वर्ष याने वासुदेव कारू मेश्राम यास उद्देशुन "भिकारी आहे यास कोंबडी देवु नको" असे अभिमण मेश्राम यास म्हटले वरून वासुदेव मेश्राम व मिताराम मेश्राम याचे मध्ये वाद विवाद भांडण झाल्याने मिताराम मेश्राम हा आपले घरी जावुन लोखंडी वासला घेवुन येवुन वासुदेव मेश्राम हा आपले घरी असतांना मिताराम मेश्राम याने पाठीमागेवुन येवुन वासुदेव मेश्राम यास खुन करण्याचे उद्देशाने लोखंडी वासल्याने डोक्यावर मारुन गंभीर जख्मी करून पळुन गेला. घटनेची माहीती गावातील पोलीस पाटील मनोज रतिराम हुकरे, वय ४८ वर्ष रा. पारडी यांना मिळताच घटणास्थळी जावुन रक्ताचे थारोळयात पडलेला जख्मी वासुदेव मश्राम यास उपचारा करीता दवाखण्यात घेवुन जावुन घटणेची तक्रार पोलीस ठाणे दिघोरी येथे दिलेवरून आरोपी मिताराम मेश्राम याचे विरूध्द अप. क्र. २४/१६ कलम ३०७ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन ठाणेदार सहा. पोलीस निरीक्षक बेनीमाधव यादव यांनी सुरु करुन गुन्हयातील आरोपी मिताराम मन्साराम मेश्राम, वय ४७ वर्ष रा. पारडी यास तात्काळ अटक केले व साक्षपुरावा गोळा केला. आरोपी विरुध्द योग्य व सबळ पुरावे मिळुन आल्याने आरोप पत्र जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ६५/१६ अन्वये सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी **अतिरीक्त सत्र न्यायाधिश श्री. सचीन. बी. भंसाली सा.** यांचे न्यायालयात चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **अॅडव्होकेट श्री. रमाकांत खत्री सहा.सरकारी अभियोक्ता, सत्र न्यायालय भंडारा** यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक ०४.०८.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरुप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी नामे मिताराम मन्साराम मेश्राम, वय ४७ वर्ष** याचे विरुध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३०७ भा.द.वि.मध्ये सात वर्ष सश्रम कारावास व २०००/-रुपये दंड, दंड न भरल्यास १ महिणा सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्या आली**. सदर गुन्हयात सहा पोलीस निरीक्षक, निलेस गावंडे, ठाणेदार पोलीस ठाणे दिघोरी यांचे मार्गदर्शनात पोलीस शिपाई अजित वाहणे यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

(जितेंद्र के. आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ०९४०३१०९७२०

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनीधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत**, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.